# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.06.2026** **वार:सोमवार**

---

1. राज्यातील मान्सूनच्या प्रगतीचा वेग 15 जूनपर्यंत कमी होणार असल्यानं शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन
2. मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्य शासनाचा पुढाकार
3. मुंबईत सोने तस्करी करणाऱ्या टोळीवर कारवाई-सात जणांना अटक आणि
4. अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी क्रिकेटमध्ये दुसऱ्या दिवस अखेर भारताची सामन्यावर मजबूत पकड

**मान्सून**

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतल्या काही भागांमध्ये 9 जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर किमान 15 जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर कमी होण्याची तसंच मान्सूनच्या प्रगतीचा वेगही कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळं शेतकऱ्यांनी आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. विजांच्या कडकडाटावेळी झाड, तसंच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबू नये, असं आवाहन कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागानं केलं आहे.

अलं निनोच्या प्रभावामुळे या वर्षी सरासरी 92 टक्के पाऊस पडणार असला तरी मराठवाडा, पश्चिम विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे आणि इतर अवर्षणग्रस्त भागांत पाऊस कमी पडण्याची शक्यता आहे. त्याबाबत शेतकऱ्यांना शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येऊ नये आणि त्यांचं नुकसान कसं टाळता येईल यासाठी शासन प्रयत्नरत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते काल नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले.....

**अल निनोच वर्ष आहे एव्हरेज पाऊस जरी ब्याण्णव टक्के असला तरी देखील विशेषतः मराठवाडा पश्चिम विदर्भाचे काही जिल्हे उत्तर महाराष्ट्राचे काही जिल्हे आणि आपला अवर्षण प्रवळ भाग या भागामध्ये त्यापेक्षा कमी पाऊस पडण्याची संभावना आहे आणि म्हणूनच शेतकऱ्यांनाही सातत्याने मी अडवायजरी देतो की त्यांनी पेरणी तरी केली पाहिजे जेणेकरून दुबार पेरणीची वेळ येऊ नये प्रयत्न आहे की कमी पावसातही जेवढं जास्तीत जास्त त्या ठिकाणी नुकसान टाळता येईल जेवढं कमीत कमी नुकसान होईल तेवढं झालं पाहिजे असा प्रयत्न चालूये.**

**मानसिक आरोग्य-मुख्यमंत्री**

राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी राज्य शासनानं महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये 'उडान' प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मंजुरी दिली आहे. ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर आणि अन्यथा फाउंडेशन या दोन संस्थांच्या सहकार्यानं जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. हा करार 1 ऑगस्ट 2026 ते 31 जुलै 2031 या कालावधीसाठी लागू राहणार असून, तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्यानं राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. राज्यात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत्या प्रमाणात समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**<u>बस लोकार्पण</u>**

एस.टी.च्या बारामती आगारात 'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बससेवेचं लोकार्पण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते काल करण्यात आलं. बसमधील स्वच्छता राखणं, बस वेळेवर सोडणं, प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांच्या समस्या सोडविण्यावर राज्य परिवहन महामंडळानं भर द्यावा, असे निर्देश पवार यांनी यावेळी दिले. बारामती बसस्थानकाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानामध्ये 1 कोटी रुपयांचं प्रथम क्रमांकाचं बक्षीस मिळल्याबद्दल बारामतीकरांचं आणि महामंडळाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचं त्यांनी अभिनंदन केलं.

**<u>नक्षली संवाद-गडचिरोली</u>**

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलिस महासंचालक सदानंद दाते आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी, गडचिरोलीमध्ये आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांशी काल संवाद साधला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निर्धारानंतर गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद जवळपास संपुष्टात आला आहे. त्याअनुषंगाने विविध विकासकामांचं नियोजन आणि आढावा घेण्यासाठी अग्रवाल आणि दाते यांनी नवेगाव इथल्या नवजीवन वसाहतीला भेट दिली. आत्मसमर्पित नक्षल्यांच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असून शासनाच्या विविध योजनांचा त्यांनी लाभ घ्यावा असं आवाहन मुख्य सचिव अग्रवाल यांनी केलं.

**<u>वाहन कारवाई</u>**

राज्यातल्या रस्ते सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या अतिभार आणि इतर अवैध मालवाहतुकीच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयानं राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. या मोहिमे अंतर्गत राज्यातील विविध आरटीओ कार्यालयांच्या पथकांना इतर जिल्ह्यांमध्ये पाठवून संयुक्त तपासणी करण्यात येणार आहे. दोषी आढळणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

**<u>सेवपूर्तीची धाव</u>**

पुण्याचे सेवानिवृत्त सहायक पोलिस आयुक्त विष्णू ताम्हाणे यांनी सेवपूर्तीच्या वेळी सलग 58 किलोमीटरचं अंतर धावत पूर्ण करून पुणेकरांना सुदृढ आरोग्याचा संदेश दिला. याबाबत आकाशवाणीशी बोलताना विष्णू ताम्हाणे म्हणाले....

**माझी पुणे सेवेची कारकीर्द पुणे शहरातूनच सुरू झालेली आहे. शिवाजीनगरचं पोलिस ग्राऊंड जे आहे त्या ठिकाणी मी ज्यावेळेस पोलीस उपनिरीक्षक पदासाठीची निवड चाचणी असते ती फिजिकल तिथं दिली होती आणि त्याचबरोबर माझं पुणे विद्यापीठात शिक्षण झालं होतं. त्यामुळे माझ्या मित्रांसोबत प्लॅन ठरला. साधारण तीस तारखेला नोकरी समाप्तीच्या आदल्या दिवशी रात्री बाराला हा रन सुरू केला. शिवाजीनगर येथून पन्नास जणांचा आमचा सगळ्या टीम होती. रन करायला सुरुवात कुटुंबातील सदस्यांसह नातेवाईक आणि मित्रपरिवार तर आम्ही तिथून सुरु केल्यानंतर सिंहगड रोड, भारती विद्यापीठ आणि मुंडवा पुणे कमिश्नर ऑफिस आणि त्यानंतर खडकी आणि पुणे विद्यापीठ असा अठ्ठावन्न किलोमीटरचा रन केला आणि रन जो आहे तो शिवाजीनगर या ठिकाणीच केला मला या माध्यमातनं पुणेकरांना एक संदेश द्यायचा होता की अशा प्रकारची सेवानिवृत्तीनंतरसुद्धा त्यांनी ॲक्टिव्ह राहावं हा या माध्यमातून संदेश द्यायचा होता.**

**<u>सायकल-सांगली</u>**

जागतिक सायकल दिनानिमित्त 'संडेज ऑन सायकल' या उपक्रमाचं उद्घाटन काल पुण्यात महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते झालं. म्हाळुंगे-बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात आयोजित या कार्यक्रमामध्ये नागपुरे यांनी स्वतः सायकल चालवत निरोगी जीवनशैलीसाठी सायकलिंगचं महत्त्व अधोरेखित केलं. सांगलीमध्येही काल पोलीस दल आणि जिल्हा क्रीडा कार्यालयानं शहरातून सायकल रॅली काढली; यात पोलिस अधिकारी, सायकलपटू आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

**सोने तस्करी**

महसूल गुप्तचर संचालनालयानं 'ऑपरेशन गोल्डन नेक्सस' अंतर्गत मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोन्याची तस्करी करणाऱ्या एका टोळीवर काल कारवाई केली. या कारवाईत सुमारे पाच कोटी रुपये किमतीचं तीन किलोहून अधिक परदेशी सोनं जप्त केलं. या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तस्करी करणाऱ्यांनी हे सोनं आपल्या शरीरात लपवून आणलं होतं, विमानतळावरील कर्मचाऱ्यांनी ते सोनं विमानतळाबाहेर नेऊन पुढे पोहोचवण्यास मदत केली होती.

**अनुसूचित जातीं-अकोला**

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात राज्यस्तरीय परिसंवादाचं काल अकोल्यात आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी राज्य सरकारच्या उपवर्गीकरणाच्या निर्णयावर जोरदार टीका करण्यात आली. बदर समितीनं दिलेला वस्तुनिष्ठ अहवाल सार्वजनिक करण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. हा अहवाल राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगासमोर सादर करणं आवश्यक होतं, मात्र त्याबाबत कोणतीही प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याचा आरोप यावेळी माजी समाजकल्याण मंत्री राजकुमार बडोले यांनी केला. अनुसूचित जातींमधील सर्व 59 जातींचा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकास प्रथम करण्यात यावा, अशी मागणी या परिसंवादात करण्यात आली.

**स्वच्छता मोहीम-नवीमुंबई**

नवी मुंबईतल्या पाम बिच मार्गानजिक डोलाया सागर किनाऱ्याजवळच्या पाणथळ जागेत सागरी किनारा स्वच्छता मोहीम काल राबविण्यात आली. यामध्ये महापौर सुजाता पाटील यांनीही सहभाग नोंदवला. यावेळी किना-यावर आलेला प्लास्टिक आणि  तत्सम 110 गोणी कचरा गोळा करण्यात आला.

**क्रिकेट**

भारत-अफगाणिस्तान यांच्यात न्यू चंदीगड इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या कालच्या दुसऱ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा अफगाणिस्ताननं 5 गडी बाद 113 धावा केल्या आहेत. तत्पूर्वी भारतानं काल आपला डाव 8 गडी बाद 564 धावांवर घोषित केला. कर्णधार शुभमन गिलनं 126, के. एल. राहुलनं 100, तर ऋषभ पंत आणि साई सुदर्शन यांनी प्रत्येकी 81 धावा केल्या. वॉशिंग्टन सुंदरनं नाबाद 52 धावांची खेळी केली. अफगाणिस्तानचा संघ अद्यापही 451 धावांनी मागं आहे.

**पाऊस**

**सांगली** शहरासह मिरज, तासगाव आणि कवठेमहांकाळ तालुक्यांमध्ये काल मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. काही ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित झाला होता.

**रत्नागिरी** जिल्ह्यातही मान्सूनच्या सरी बरसायला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातल्या राजापूर तालुक्यात काल संध्याकाळी चांगला पाऊस झाला.

**नांदेड** शहर आणि परिसरात वादळी वारं आणि विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला, यावेळी शहरातल्या बहुतांश भागातला वीज पुरवठा खंडित झाला होता.

**हवामान**

नेऋत्य मोसमी पाऊस आज पश्चिम-मध्य बंगाल उपसागराचा ईशान्य आणि वायव्य भाग व्यापण्याची शशक्यता आहे. राज्यातील कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**